## <u>फौ.क्रिर.किर अर्ज क्रं.५६/२०२२ मधील निशाणी १ वरील आदेश</u>

<u>मंगेश विष्णू लाड महाराष्ट्र सरकार तर्फे कळे पोलीस ठाणे.</u>

अर्जदाराने प्रस्तुत अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४५७ अन्वये जप्त मुद्देमाल सुपूर्तनाम्यावर परत मिळणेकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार यांच्या मालकीची हिरो मोटोक्रॉप कंपनीची स्प्लेंडर प्लस तिचा अधिकृत नोंदणी क्र. एम.एच–०९ इ.झेड.–१०३४, चेसीस क्र.MBLHA0093JHF00335 व इंजिन नं. HA10AFJHE01578 असून सदरचे वाहन कळे पोलीस ठाणे यांनी कळे गु. र. नं. ७३/२०२२ मध्ये जप्त केलेली आहे. अर्जदार यांनी सदर गाडी सुपूर्तनाम्यावर त्यांना देण्याची विनंती केली आहे.

**०३.** तपास अधिकारी यांनी नि. ४ वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. तपासअधिकारी यांनी त्यांचे म्हणण्यात असे कथन केले आहे की, योग्य त्या अटी शर्तीवर देणेस हरकत नाही अशी विनंती केली आहे.

सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी नि. १ वर त्यांचे लेखी म्हणणे दिले असून त्यामध्ये त्यांनी सदर अर्जदार हा गु.र.नु. ७३/२०२२ मधील मुख्य आरोपी आहे. सदरचे वाहन प्रत्यक्षरित्या आरोपीनी गुन्हा करणेकरीता वापरली आहे. सदर वाहन अर्जदारास बाजारभावाप्रमाणे ५०% अनामत रक्कम, बॉन्डवर देणेस हरकत नाही अशी विनंती केली आहे.

**०४.** सदर प्रकरणात अर्जदार यांनी जप्त केलेल्या गाडीचा दस्तऐवज वर्णनयादीसोबत दाखल केला आहे. त्यामध्ये त्याने एफ.आय.आर.ची नक्कल प्रत, आधार कार्ड व आर. सी. बूक यांच्या साक्षांकित प्रति दाखल केल्या आहेत. उपरोक्त नमुद कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर जप्त वाहन हे अर्जदार मंगेश विष्णू लाड यांचे नावावर दिसून येते. अर्जदाराशिवाय इतर कोणीही इसम त्या वाहनाचे मालक आहे, असा आक्षेप घेतलेला नाही.

**०५.** तसेच तपास अधिकारी तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी देखील सदर वाहन अटी व शर्तीवर सदर अर्जाचा विचार करणे शक्य आहे. सदर वाहन वर नमुद गुन्हयाचा निकाल लागेपर्यंत पोलीस ठाण्यात पडून देणे उचित होणार नाही. त्यामुळे संपुर्ण परीस्थितीचा विचार केल्यानंतर व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे **जगजीत सिंग कलसी वि. म.शासन (२०१३ (२) ए.बी.आर.२२)** निर्देश लक्षात ठेवून सदर न्यायालयास प्रस्तुतचे वाहन सुपुर्तनाम्यावर देण्याचा अधिकार आहे.

०६. माझ्या माहितीप्रमाणे जप्त केलेले दुचाकी वाहन हे अर्जदाराच्या रोजच्या वापरातील असून अर्जदारास दैनंदिन कामकाजासाठी वाहनाची आवश्यकता आहे. तसेच सदर वाहन पोलीस ठाणे येथे पडून राहिल्यास त्यामध्ये बिघाड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर जप्त वाहन अर्जदारास योग्य त्या अटी व शर्तीसह सुपूर्तनाम्यावर परत करणे योग्य राहिल. सबब, मी पूढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :–

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात आला.

२. अर्जदार यांना कळे पोलीस ठाणे गु.र.नं.७३/२०२२ मध्ये जप्त केलेली हिरो मोटोक्रॉप कंपनीची स्प्लेंडर प्लस तिचा नोंदणी क्रमांक एम.एच–०९ इ.झेड.–१०३४, चेसीस क्र.MBLHA0093JHF00335 व इंजिन नं. HA10AFJHE01578 या गाडीचा ताबा रक्कम रू. ७०,०००/– (अक्षरी सत्तर हजार रूपये मात्र) च्या क्षतिपूर्तीचे बंधपत्र दाखल केल्यास सुपूर्तनाम्यावर परत करण्यात यावा.

३. अर्जदार याने वर नमुद वाहनाबाबत रक्कम रू.७०,०००/– चे बंधपत्र तपासधिकारी, कळे पोलीस ठाणे यांचेकडे द्यावे.

४. अर्जदार याने वर नमुद परत मिळालेल्या वाहनामध्ये कोणताही बदल करू नये. तसेच कुणासही विक्री किंवा हस्तांतरीत करू नये. तसेच सदर वाहन आवश्यकता

असेल तेव्हा न्यायालयाचे आदेशाप्रमाणे हजर करावे.

५ प्रस्तुत गुन्हयातील कळे पोलीस ठाणे अधिकारी यांनी जप्त वाहनाचे छायाचित्र काढुन सदर सुपुर्तनामा क्षतिपूर्ती बंधपत्र हे पोलीस अधिका–यांना तपासासाठी व दोषारोप पत्रासोबत दाखल करण्यासाठी पाठवावे.

Neha K.Nagargoje

Digitally signed by Neha K.Nagargoje
Date: 2022.10.15 10:51:01 +0530

कळे–खेरीवडे.
दि. १४.१०.२०२२

(नेहा के. नागरगोजे)
न्यादंडाधिकारी प्रथमवर्ग,
कळे–खेरीवडे.